दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शनिवार दि.२६ जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २४० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Saturday 26 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 240 ● Pages 4 ● Rate 4 Rs

**प्रतिनिधी नेमणे आहे**

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा , तालुका , सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा .

# आवादाच्या औलादींचा कहर

## उपोषणास बसलेल्या शेतकऱ्याच्या आईचा धास्तीने मृत्यू

## केज तालुक्यात संतापाचा सूर ; मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

**केज । प्रतिनिधी**

आवादाच्या ढिसाळ कारभारामुळे केज तालुक्यातील संतोष देशमुख खून प्रकरणाने संपूर्ण राज्यात खळबळ उडवली असतानाच, आणखी एक दुर्दैवी घटना समोर आली आहे. केज शहरातील धारूर रोड लगत सर्वे नं. ७६ मधील भोसले वस्तीवर सुरू असलेल्या वीज प्रकल्पामुळे उद्भवलेल्या वादात, न्याय मिळेल की नाही या धास्तीने उपोषणास बसलेल्या संतराम गोपालराव भोसले यांच्या आई सुबाबाई गोपाळ भोसले (वय ५८ ) यांचा दुःखद मृत्यू झाला.भोसले वस्तीतील सर्व अल्पभूधारक शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह त्यांच्या शेतजमिनीवर अवलंबून आहे. मात्र आवादा कंपनीच्या अधिकाऱ्यांनी या शेतातून वीज वाहिन्या नेण्यासाठी आग्रही भूमिका घेतली. याविरोधात शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे वारंवार अर्ज करून आपली व्यथा मांडली, मात्र याकडे दुर्लक्ष करत उलट शेतकऱ्यांना स्थानिक गुंडांच्या मदतीने धमकावण्यात आले.

संतप्त शेतकऱ्यांनी दि. २४ जुलै २०२५ रोजी केज तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले. उपोषणकर्त्यांमध्ये सुर्यकांत तेलंग, थोरात गोरख, अशोक भोसले, संतराम भोसले, मारुती भोसले, पांडुरंग भोसले, बलभीम तेलंग, रेनुका तेलंग, संगिता तेलंग, सविता भोसले, स्वाती भोसले, मिरा थोरात, मेघराज भोसले आदींचा समावेश होता. आपल्या मुलाच्या भवितव्याबाबत चिंताग्रस्त असलेल्या सुबाबाई भोसले यांनी उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी २५ जुलै रोजी या संघर्षामुळे मानसिक धक्का बसून प्राण सोडले.

शेतकऱ्यांचा संघर्ष, सरकारी यंत्रणेची उदासीनता आणि खासगी कंपनीच्या मनमानीमुळे पुन्हा एकदा केज तालुका धगधगू लागला आहे. आता न्याय मिळतो का, की पुन्हा एखादी आई धास्तीने प्राण गमावते, हे पाहणे गरजेचे आहे.



### मृत्यू नंतरची स्थिती

लोकप्रतिनिधींची अनुपस्थिती : घटनेनंतर एकही लोकप्रतिनिधी घटनास्थळी पोहोचले नाहीत. मात्र लोकप्रतिधी कशासाठी निवडणून दिले ? हा प्रश्न जनतेत उपस्थित केला गेला .

### प्रशासनाचा उदासीनपणा

मृतदेहाचा पंचनामा करण्यास प्रशासनाने टाळाटाळ का केली ? सदरील मृतदेहाचा पंचनामा का केला नाही ? यामागे काय गौडबंगाल आहे ? याची चर्चा जोरात सुरू आहे.

### मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

सुबाबाई यांच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या आवादा कंपनीचे सागर साबळे, संदीप कातरे व प्रशासनातील संबंधित अधिकारी यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा यासाठी केज पोलीस ठाण्यात लेखी तक्रार देण्यात आली आहे व त्यानंतरच अंतिम संस्कार करण्यात आले .

## बिबट्या पाळीव प्राण्यांना भक्षक बनवतोय सतर्क रहा

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील वांगी परिसरात बिबट्याच्या भक्षक बनण्याच्या घटना चिंताजनक आहेत. बालासाहेब गोरख हाडूळे यांची ११ शेळ्या बिबट्याने ठार मारली आहे, आणि यापूर्वीही एका वासराचा बळी घेतल्याची घटना घडली आहे.संबंधित गावांतील शेतकऱ्यांनी विशेष सावधानी बाळगणे आवश्यक आहे, विशेषत: वांगी, शिवणी, काठोडा, भवानवाडी, कुटेवाडी, जरुड, बाभळखुंटा, बोरफडी, हिवरा, मौजवाडी, मौज, बकरवाडी, घाटसावळी, पोखरी, आणि मैंदा या गावांमध्ये. शेतकऱ्यांनी आपल्या जनावरांचे संरक्षण करण्यासाठी आणि शेती कामे करताना अधिक काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वन विभागाशी या घटनेबाबत संवाद साधण्यात आला आहे, त्यामुळे शेतकऱ्यांनी सतर्क राहून सहकार्य करणे गरजेचे आहे. या गंभीर परिस्थितीत सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करून आपल्या आणि आपल्या जनावरांच्या सुरक्षेसाठी सक्रिय राहणे आवश्यक आहे. आपल्या जागरूकतेमुळे उन्नती साधता येईल आणि संकटांचा सामना करणे शक्य होईल.



## शिक्षक कॉलनी भागातील नागरिकांनी गणेश उत्सव आदर्श पद्धतीने साजरा करण्याचा घेतला निर्णय

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील शिक्षक कालनी भागातील नागरिकांनी बैठक घेऊन आगामी गणेश उत्सवात कोणताही धांगडधिंगा न घालता एकदम साध्या पद्धतीने गणेश जयंती उत्सव साजरा करुन एक आदर्श निर्माण करण्याचा निर्णयघेतला आहे.कोणालाही वर्गणी न मागण्याचा निर्णय समस्त शिक्षक कॉलनी भागातील रहिवासी लोकांनी घेऊन एक आदर्श निर्माण केला आहे.येणारा गणेश उत्सव व इतर सर्वच उत्सव साजरे करताना पारंपरिक व साध्या पद्धतीने,उत्साहात प्रत्येक उत्सव साजरा करण्याचा निर्णय एकमताने घेण्यातआला आहे.डिजेचा धिंगाणा व इतर गोष्टी यामुळे टाळल्या जातात.गणेश उत्सवात पारंपरिक देवाची गाणी,पुजातसेच प्रसाद ठेऊन गणेश उत्सव साजरा करण्यात येणार आहे.शिक्षक कॉलनी,बीड रोड केज च्या नागरिकांचे व युवकांचे याकौतुकास्पद निर्णयामुळे सर्वत्र कौतुक केले जात आहे. यामध्ये दत्ता धस पंत, पिटू भैय्या तांदळे, खय्युम शेख,भगवान केदार,सुनील घोळवे, अमर केजकर,राजेश गवळी सर,डॉ. विजयकुमार धस, प्रकाश मुंडे,सोनू धस, दिनकर तांदळे सर, प्रशांत मुळे,रवि घुले, अमोल धस,संदीप भुतडा,चंदू चौरे,सुरेश घुले,राजेश मुळे, राजेभाऊ शिंदे, सुर्यवंशी दादा,पाळवदे सर,घुले सर,गोटू पाळवदे,अमोल मुंडे, वैभव केंद्रे,डॉ.डापकर साहेब,नवनाथ घुले, राज ढाकणे,प्रा.मुकूंद घुले सर,रवि अंधारे, विजय अंधारे,गालफाडे तात्या,मयुर भैय्या टकले,डोईफोडे मेजर, विकास मुळे,अतूल ठोंबरे,अमोल ठोंबरे, चौरे साहेब दुकानदार, हांगे सर,विक्की घोडके, बाबा मुंडे सर व इतर प्रमुख मान्यवर यांनी हा एक चांगला पायंडा मांडला आहे.या निर्णया चे सर्वस्तरातून,व्यापारी वर्ग,नेते मंडळी तसेच सामान्य जनतेतुन केज शहरात सर्वत्र कौतुक केले जात आहे.ईतरांनी या निर्णयाचा आदर्श घ्यावा अशी अपेक्षा नागरिकांतुन व्यक्त केली जात आहे.















संपादकीय

# घ्या जरा जलधडा...

मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या अप्पर वैतरणा, मोडक सागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार, तुळशी या सात धरणांची पाणीसाठवण क्षमता १४ लाख ४७ हजार ३६३ दशलक्ष लिटर आहे. त्यांतून रोज तीन हजार ८५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होतो. मुंबईची लोकसंख्या पाहता मुंबईची दैनंदिन पाण्याची गरज ही ४ हजार २०० दशलक्ष लिटर आहे. मात्र सध्या सात धरणांतून होणारा पाणीपुरवठा हा तीन हजार ८५० दशलक्ष लिटर आहे. त्यातही २५ ते ३० टक्के पाण्याची चोरी होणे, पाणी गळती हे होतच असते. काही वेळा विविध विकासकामांमुळे जलवाहिन्यांचे नुकसान होऊन बरेच पाणी वाया जाते. मात्र या पाण्याची किंमतही अनेकांना नाही. उन्हाळा आला की धरणांतील पाणीसाठा नजरेसमोर येतो आणि त्यानंतर पाण्याचे खरे मोल समजते. मुंबईला पाणी पुरवठा होत असतानाच जलवाहिन्यांमधून होणारी पाणीगळती हा महत्त्वाचा मुद्दा असून यातील ३० टक्के पाणी वाचवण्यासाठी मुंबई महापालिकेने प्रयत्न करायला हवेत. जलवाहिन्यांलगत असलेल्या झोपड्या, चाळींतून होणारी पाणीचोरी, भूमिगत किंवा रस्त्याला समांतर अशा जलवाहिन्यांमधून होणारी गळती आणि त्यांची सुरक्षा असे अनेक मुद्दे समोर येतात. या मुद्यांकडे आवर्जून लक्ष देणे गरजेचे आहे.

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सात धरणांपैकी विहार आणि तुळशी वगळता अन्य धरणे ही मुंबईच्या हद्दीबाहेरच आहेत. तिथून सुमारे सव्वाशे ते दीडशे किमी अंतरावरून विविध जलवाहिन्यांद्वारे पाणीपुरवठा होतो. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या या जलवाहिन्यांचे बाह्य विभागामध्ये सुमारे ३८० किलीमीटर अंतराचे अतिशय मोठे जाळे आहे. या जलवाहिन्या जंगल परिसर, दुर्गम भागातून मुंबईच्या दिशेने अंथरलेल्या आहेत. तसेच बहुतांश अंतरात त्या जमिनीखालीही आहेत. त्यामुळे पाणीगळती किंवा पाणीचोरी रोखण्यासाठी या जलवाहिन्यांची सुरक्षा आणि त्यांची देखभाल ही महत्त्वाची आहे. जलवाहिन्यांवर माती, गाळ, दमट हवामान, कचरा आणि इतर रसायने यांचा प्रतिकूल परिणाम होत असतो. त्यामुळे जलवाहिन्यांवर गंजदेखील चढतो. मोठ्या जलवाहिन्यांना जोडूनच पाणी वितरणासाठी अन्य जलवाहिन्याही जोडलेल्या असतात. त्यातूनही पाण्याची गळती होत असते. ५० ते १०० वर्षे आणि त्यापेक्षाही जुन्या असलेल्या जलवाहिन्या बदलून त्याऐवजी नवीन जलवाहिन्या टाकणे आणि जलवाहिन्यांचे मजबूतीकरण हा पर्याय आहे आणि तो मुंबई महापालिकेने निवडलाही आहे. त्याचे नियोजन होत असले तरीही प्रत्यक्षात मात्र दिसून आलेले नाही. मुंबईत सुरू असलेल्या विविध विकासकामांचा फटका जलवाहिन्यांना बसतो आणि गळती लागून पाणी वाया जाते. पाणीगळती, पाणीचोरी तसेच विविध विकासकामांमुळे जलवाहिन्या फुटणे याबाबतच्या २०२२ आणि २०२३ मध्ये ५५ हजारपेक्षा जास्त तक्रारी मुंबईकरांनी केल्या आहेत. त्या सोडवण्यातही आल्या. मात्र हे प्रमाण पाहता जलवाहिन्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर येतोच.मुंबईत मोठ्या प्रमाणात होणारी पाण्याची नासाडी थांबवल्यास ऐन उन्हाळ्यात हेच पाणी उपयोगी पडेल. त्यामुळे विनाअडथळा सुरक्षितरीत्या पाणीपुरवठा व्हावा, यासाठी जलबोगद्याचा पर्याय मुंबई महापालिकेने निवडला आहे. मुंबईत घाटकोपर ते परळ ११० किमी जलबोगद्याचे काम हाती घेतानाच पिसे पांजरापोळ जलशुद्धीकरण केंद्र ते मुलुंडपर्यंत २१ किमीचा जलबोगदाही तयार केला जाणार आहे.पाण्याची वाढती गरज भागवण्यासाठी समुद्राचे खारे पाणी गोडे करण्यासाठी मनोरी येथे नि:क्षारीकरण प्रकल्प, पाणीसाठा वाढवण्यासाठी गारगाई, पिंजाळ, दमणगंगा पिंजाळ नवीन धरण आणि सांडपाण्यावर तीन स्तरावर प्रक्रिया करून पाण्याचा पुनर्वापर हे प्रकल्प मुंबई महापालिकेने हाती घेतले. मात्र, गेली बरीच वर्षे विविध कारणांमुळे ते पूर्णत्वास जाऊ शकलेले नाहीत. स्वप्नवत असलेले हे प्रकल्प कधी पूर्ण होतील, हेदेखील माहिती नाही. त्यामुळे वाढती लोकसंख्या, पाण्याची गरज आणि उन्हाळा जवळ आल्यावर जाणवणारी पाणीटंचाई पाहता तातडीचे उपाय आधीच शोधणे गरजेचे आहे. यासाठी मुंबईकरांमध्ये पाणी बचतीसाठी वर्षभर जनजागृती झालीच पाहिजे. रहिवासी संकुल, शासकीय संस्था, हॉटेल, कारखाने, छोटे–मोठे उद्योग यांत ही जनजागृती रुजायलाच हवी. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सात धरणांतील पाणीसाठा दहा टक्केच्या खाली जातो आणि पाणीटंचाईचे सावट मुंबईवर दाटू लागते. पाण्याची वाढती मागणी आणि वाढलेल्या उन्हामुळे पाण्याचे होणारे बाष्पीभवन यामुळे धरणांतील पाणी तळ गाठते, असे महापालिका अधिकारी सांगतात. मात्र नुकत्याच एका आकडेवारीतून राज्यातील मोठ्या, मध्यम आणि लघुसिंचन प्रकल्पातून दरवर्षी १६५ टीएमसी पाण्याचे बाष्पीभवन होत असल्याची माहिती राज्य सरकारच्या जलसंपदा विभागाच्या पाणी लेखापरीक्षण अहवालातून समोर आली. यातून मुंबईलाही तीन वर्षे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होऊ शकेल, एवढ्या प्रमाणात पाण्याची वाफ होत असल्याचे स्पष्ट झाले. मग या पर्यायाचा मुंबई महापालिकेकडून विचार का होताना दिसत नाही, हा प्रश्नच आहे. धरणातून विसर्ग होणाऱ्या पाण्याचा योग्यरीतीने वापर करण्याचा पर्यायही आहे. या पर्यायाचाही मुंबई महापालिकेकडून विचार होत असून विहार धरणातून विसर्ग करण्यात येणाऱ्या पाण्याचा योग्य रीतीने वापर करण्यासाठी ते पाणी भांडुप जलशुद्धीकरण केंद्रात वळवून ते पिण्यासाठी वापरण्याचा पर्याय निवडला आहे. यासाठी कंत्राटदाराचीही निवड केली असून तीन वर्षांत पूर्ण होणाऱ्या या प्रकल्पासाठी १०० कोटी रुपये खर्च येणार आहे. मुंबई महापालिकेकडून पाण्याची वाढती गरज भागवण्यासाठी गेली अनेक वर्षे प्रयत्न केले जात असताना त्याला यश मात्र कधी येणार, हे पाहावे लागणार आहे. अन्यथा भविष्यात मुंबईतही भीषण पाणीटंचाईचा धोका अटळ आहे.पाण्यासाठी विविध पर्याय अवलंबायला हवेत. मात्र त्याकडे साफ दुर्लक्षच केले जाते. एप्रिल आणि मेमध्ये पाण्याची काय परिस्थिती असू शकते, हे आपल्याला लक्षात येते. त्यामुळे आधीपासूनच पाणी बचतीचे संदेश द्यायला हवेत; पण तसे होत नाही. पाणी वापराचे नियोजन कुठेच होत नाही. रहिवासी संकुले, मोठ्या हॉटेलांतील स्विमिंग पूल, वॉटर स्पोटर्स तसेच अन्य ठिकाणचा पाण्याचा चंगळवादी वापर याकाळात थांबायला हवा. शिवाय पाणीचोरी, पाणीगळती रोखली तर २५ ते ३० टक्के वाया जाणारे पाणी आपल्याला उपलब्ध होईल.–प्रदीप पुरंदरे, जल अभ्यासक

# नेमके चुकतेय कोणाचे?




शहरात गेल्या आठवड्यात पूर्वमोसमी किंवा वळवाचा पाऊस झाला आणि अनेक नव्या ठिकाणी पाणी साचले, काही ठिकाणी ते नागरिकांच्या घरातही शिरले. पुणे महानगरपालिकेने नेहमीप्रमाणे नालेसफाईपासून पावसाळापूर्व कामे पूर्ण केल्याचा दावा केला आहे. ही कामे पूर्ण झाली असती, तर शहरावर ही परिस्थिती उद्भवली नसती. मग, नेमके चुकतेय कोणाचे? यंत्रणांचे की पावसाचे?

पुण्यात काही वर्षांपूर्वी पावसाळी हंगामातील जून–जुलै या दोन महिन्यांतच जोराचा पाऊस झाला. पावसाचे सातत्य टिकून असल्याने शहरभर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले. या खड्ड्यातून वाट काढता काढता नागरिकांच्या नाकीनऊ आले. त्या रागातून पुणेकरांनी महापालिकेची सत्ता वेगळ्या पक्षाच्या हातात सोपवली. त्यानंतर, त्या पक्षाकडून अपेक्षित कामे झाली नाहीत; त्यामुळे गेल्या निवडणुकीत एकाच पक्षाला पूर्ण बहुमताची सत्ता दिली. किमान, दर वर्षी जाणवणाऱ्या समस्या तरी दूर होतील, अशी एक भाबडी अपेक्षा पुणेकरांनी ठेवली, त्यात त्यांची तरी काय चूक? महापालिकेवर गेल्या दोन वर्षांहून अधिक काळ कोणत्याच पक्षाची सत्ता नाही. 'हा माझा, तो माझ्या जवळचा' असे सांगणारे नगरसेवक नसल्याने प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून नागरिकांची कामे होतील, ही आशा पूर्ण धुळीस मिळाली आहे. लोकप्रतिनिधी असोत, प्रशासकीय राजवट असो किंवा कोणी असो–नसो; पुण्यातील नागरिकांच्या मूलभूत गरजा किंवा अपेक्षांची पूर्तता होणे, हे कधीही पूर्ण न होणारे स्वप्न आहे, असेच म्हणायला हवे.

शहरात एखाद्या जलवाहिनीसाठी किंवा मैलापाणी वाहिनीसाठी रस्त्याचे खोदकाम झाले, तर तो दुरुस्त करताना 'इंडियन रोड काँग्रेस'च्या निकषांनुसार काही पथ्ये पाळावी, हा नियम सांगतो. मात्र, महापालिकेतील वर्षानुवर्षे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना पुस्तकी नियमांपेक्षा स्वत:चे वेगळे नियम करण्याची सवय लागली आहे; त्यामुळे शहरात खोदलेला एकाही रस्त्याचे निकषांनुसार पुनर्डांबरीकरण केले जात नाही. बहुतांश रस्त्यांचा खोदलेल्या भागावर काँक्रिटची मलमपट्टी लावली जाते. डांबर आणि काँक्रिट एकमेकांना पूरक नाहीत, हे 'इंजिनीअर' पदवी घेऊन महापालिकेत काम करणाऱ्या सर्वांनाच माहिती आहे, तरीही 'हीच आमची दुरुस्ती' असे सर्रास सांगितले जाते. मग, पालिकेतील अधिकाऱ्यांना आता तात्पुरती दुरुस्ती केली आहे, पावसाळा संपला की व्यवस्थित करू अशा कारणापासून ते पुन्हा तिथे काम करावे लागणार असल्याने परत पूर्ण डांबरीकरण केलेले नाही, यापर्यंत कोणतीही कारणे सापडतात. खोदलेल्या रस्त्याची पातळी (रोड लेव्हल) तर कधीच आधीच्या रस्त्याच्या सम पातळीवर येत नाही. त्यामुळे पावसाळ्यात कोणत्या तरी एका बाजूला अधिक पाणी साठते. 'शास्त्र असतं ते!' हे आपल्यालाही समजत असेल, तर महापालिकेत अनेक वर्षे काम करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना नागरिकांना चांगले रस्ते द्यावेत, असे का वाटत नाही?पावसाळापूर्व होणारी नालेसफाई, हा तर केवळ आतबट्ट्याच्या व्यवहार आहे. माध्यमांना माहिती देताना 'एवढ्या किमीचे नाले', 'एवढी स्वच्छता झाली', 'एवढा गाळ काढला' असे आकड्यांवर आकडे दिले जातात. वस्तुस्थिती काय आहे, हे नाल्याच्या आजूबाजूला राहणाऱ्या नागरिकांना चांगलेच माहीत असते. एखादा भलामोठा पाऊस झाला, की नाल्यांच्या स्वच्छतेचे कसे तीन–तेरा वाजतात, याचा चांगलाच अनुभव आंबिल ओढ्यालगत राहणाऱ्या सर्वच नागरिकांनी पाच वर्षांपूर्वी (२०१९) घेतला आहे. कागदपत्रांपासून, घर–मालमत्ता आणि वाहनांपर्यंत एका रात्रीत 'होत्याचे नव्हते' झाले, तरीही या नालेसफाईबाबत ठोस कारवाई कधी झाल्याचे पाहायला मिळाले नाही. नालेसफाईसाठी यंत्रे आणि मनुष्यबळ काम करीत असल्याचा 'देखावा' कायमच निर्माण केला जातो. दर वर्षी पावसाळ्यामध्ये नाले तुंबतात आणि पाण्याचा प्रवाह नाल्यांची हद्द सोडून आजूबाजूला पसरतो, याचे कारण नक्की काय असेल, याचा अभ्यास पालिकेतील अनेक हुशार अधिकाऱ्यांना का करावासा वाटत नसेल? की काही वेगळ्याच गोष्टींचा अधिक अभ्यास केला जातो अन् या अभ्यासात कधी लोकप्रतिनिधींना बरोबर घेतले जात असल्याने प्रत्यक्ष कागदावरचा अभ्यास आणि प्रत्यक्षातील परिस्थिती, यात तफावत राहते, हे आता सर्वसामान्यांना समजू लागले आहे. महापालिकेच्या वेगवेगळ्या विभागांमध्ये समन्वय नसल्याची अनेक उदाहरणे कायमच पुण्यातील नागरिकांनी पाहिली आहेत. म्हणजे, नवा रस्ता केला, की दोन–तीन दिवसांनी येऊन पाणीपुरवठा किंवा मैलापाणी वाहिन्यांसाठी तो खणला जाणार... पदपथाची पुनर्रचना करून तो सुशोभित केला, की त्यावर पुन्हा जिमची साधने बसविण्यासाठी कुठे तरी खोदकाम होणार.. अशा कित्येक गोष्टी नागरिक रोज पाहतात. कधीतरी त्यावर सोशल मीडियावरून आवाज उठवितात; पण रस्त्यावरील काम सदोष पद्धतीने होत असल्याबाबत ना महापालिकेतील अधिकाऱ्यांना खेद, ना लोकप्रतिनिधींना खंत. महापालिकेच्या विभागांमध्ये परस्पर समन्वय नसेल, तर इतर विभागांशी तो कसा राहील? त्यामुळे शहरात काम करणाऱ्या सर्वच यंत्रणा आपल्याला पाहिजे त्या पद्धतीने काम करत राहतात. महापालिकेच्या रस्ते आणि पदपथांवर मेट्रोचे जिने आणि लिफ्टचे बांधकाम करणाऱ्या महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन (महामेट्रो) किंवा इतर तत्सम यंत्रणांना महापालिकेची परवानगी घ्यावी, त्यांचा सल्ला घ्यावा असे वाटत नाही. 'आम्ही केंद्रीय यंत्रणा आहोत, महापालिका स्थानिक यंत्रणा आहे,' असा काहींचा आविर्भाव असल्याने पावसाळी गटारे बुजवण्यापासून ते जिना–लिफ्टसाठी खांबांची जागा निश्चित करण्यापर्यंत या यंत्रणाच एकमेकांवर दोषारोप करीत राहतात. कधी एक यंत्रणा दुसऱ्या यंत्रणेला पत्र पाठवून चूक झाल्याने सुधारा, असा सल्ला देते. तर कधी दुसरी यंत्रणा तुम्हांला पूर्वकल्पना देऊनही तुमचे अधिकारी जागेवर आले नसल्याने मूळ आराखड्यानुसार काम केल्याचा दावा करत राहते; परंतु एकमेकांमध्ये संवाद साधून नागरिकांची अडचण होणार नाही, याकडे कोणाचे लक्ष नाही. त्यामुळे मेट्रो स्टेशनजवळ पालिकेच्या पदपथाची तोडफोड करून मेट्रोचे तिथे सर्व काम झाल्यानंतर पावसाळ्यातील पाणी जाण्यासाठी वाटच करून दिली नसल्याचे निदर्शनास येते.अशा अनेक गोष्टी एकापाठोपाठ समोर येतात आणि मग प्रश्न पडतो. सर्वच यंत्रणांसाठी काम करणारी तुमच्या–आमच्यासारख्या सर्वसामान्य कुटुंबातीलच आहेत. त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना रस्त्यावर साचणाऱ्या पाण्यातून जाताना किंवा जागोजागी पडलेल्या खड्ड्यांतून वाट काढताना काहीतरी त्रास तर होत असेलच ना. मग, संबंधित यंत्रणांमध्ये काम करणाऱ्या आणि अधिकारीपदावर निर्णय घेण्याची जबाबदारी असणाऱ्यांतकडे ते गाऱ्हाणे मांडतात का? आणि मांडत असतील तर त्याकडे काळजीपूर्वक लक्ष देऊन ऐकण्याची आणि सुधारणा करण्याची यंत्रणांमध्ये काम करणाऱ्यांची खरीच इच्छा आहे का? की या सर्वांसाठी मनुष्यापेक्षा त्यांना हलविणारी काही इतर धनयंत्रे अधिक मोलाची झाली आहेत. आगामी पावसाळ्यात ठिकठिकाणी पाणी साचले, गाड्या बंद पडल्या, नागरिकांची गैरसोय झाली, तर 'कमी वेळात जास्त पाऊस पडला' हे ठरावीक साच्यातील उत्तर ऐकायला आले, तर दुर्दैवाने यंत्रणांमधील सर्वांची मनयंत्रे नाही, तर धनयंत्रे अधिक कार्यक्षम आहेत, हेच खरे समजावे लागेल.

# 'टर्ब्युलन्स' म्हणजे काय?



नुकताच एका विमानात 'टर्ब्युलन्स', म्हणजे हवामान अचानक बिघडल्याने अपघात झाला. अनेक प्रवासी जखमी झाले आणि एकाचा मृत्यूदेखील झाला. गेली ४४ वर्षे मी वैमानिक म्हणून काम करीत आहे. आधी हवाईदलात आणि आता एका विमान वाहक कंपनीत. माझ्या अनुभवावरून हा विषय सोप्या भाषेत समजावून सांगण्याचा प्रयत्न करतो.विमानचालन उद्योगात वापरला जाणाऱ्या 'टर्ब्युलन्स' या इंग्रजी शब्दाला योग्य प्रतिशब्द मराठीत नाही. ढोबळपणे त्याला अशांतता, गोंधळ किंवा प्रक्षुब्धता म्हणता येईल. या लेखापुरते आपण 'टर्ब्युलन्स'ला वातावरणात माजलेली खळबळ, असे म्हणू. वातावरणात खळबळ नक्की का होते? वाऱ्याचा वेग किंवा दिशा बदलली, की खळबळ होते. संथ वाहणारी खोल नदी आणि उथळ ठिकाणी दगड–धोंड्यांमुळे खळखळत उसळत असलेले फेसाळ पाणी यांच्यातला फरक डोळ्याला दिसतो. तेच हवेत झाल्यास सहज दिसून येत नाही. वारा त्याच्या वेगामुळे जाणवतो. बंद गाडी किंवा विमानात बसले असताना वारा जाणवत नाही.

**वाऱ्याचा वेग किंवा दिशा का बदलते?**

पृथ्वीच्या स्वत:भोवती फिरण्यामुळे वातावरणात नेहमीच वारे वाहत असतात. त्यांचा अभ्यास केल्यावर, दिशा आणि वेग नक्की समजले; तेव्हा त्या वाऱ्याचा उपयोग नौकानयन करण्यासाठी शिडे वापरणाऱ्या जहाजांनी केला. त्यांना व्यापारी वारे म्हणूनच म्हणतात. पृथ्वीच्या विषुववृत्ताच्या उत्तरेला आणि दक्षिणेला वाहणाऱ्या वाऱ्याची दिशा वेगळी असते. भिन्न दिशेने येणारे वाऱ्याचे प्रचंड प्रवाह एकमेकांवर आदळले, की हवेत खळबळ होते. स्थानिक तापमान वाढले किंवा कमी झाल्यास वातावरणाचा दाब कमी–जास्त होतो. वारे उच्च दाबाकडून कमी दाबाकडे आणि तापलेल्या जमिनीपासून आकाशाकडे वाहू लागतात. यामुळे हवेतली खळबळ अजूनच वाढते. वातावरणात पुरेशी आर्द्रता असते, तेव्हा ढग तयार होतात. व्यावसायिक प्रवासी विमानांमध्ये प्रवाशांची काळजी घेण्यासाठी आणि प्रवास सुखकर होण्यासाठी, आम्ही खळबळी हवा असलेले परिसर टाळतो. त्यासाठी उड्डाण करण्यापूर्वी आणि उड्डाणाच्या दरम्यान आम्हाला अचूक व ताजे हवामान अंदाज वारंवार दिले जातात.

**छुपी खळबळ**

ढग दिवसा डोळ्याला दिसतात आणि चमकणाऱ्या विजा रात्री दिसतात. मोठ्या ढगांजवळ खळबळी वारे नक्कीच असते, म्हणून आम्ही अशा ढगांजवळ जाणे टाळतो. त्यासाठी विमानात हवामान रडार असतात. ते आम्हाला रात्रीही ढग दाखवतात. मग आम्ही ठरलेला मार्ग सोडून, ढगांच्या बाजूने पुरेसे अंतर ठेवून पुढे जात राहतो. त्यासाठी इंधन आणि वेळ जास्त खर्च होतो; पण प्रवाशांना आराम मिळावा, म्हणून आम्ही ते करतो. खळबळी वाऱ्याचा आणखी एक प्रकार आहे; त्याला 'क्लिअर एअर टर्ब्युलन्स' (कॅट) म्हणतात. याचा अर्थ आहे, निरभ्र हवेतली खळबळ. ती डोळ्याला दिसत नाही, हवामान रडारवरदेखील स्पष्ट कळत नाही. ही छुपी खळबळ साहजिकच धोकादायक असते. नुकताच झालेला अपघात यामुळेच झाला असावा, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार, ते विमान तब्बल तासभर खळबळी वाऱ्यामध्ये अडकले होते. त्यामध्येच एके ठिकाणी वाऱ्याच्या वर–खाली होणाऱ्या आणि न दिसणाऱ्या हालचालीमुळे ३७ हजार फुटांवर चाललेले विमान अचानक चारशे फूट वर गेले आणि लगेचच चारशे फूट खाली कोसळले. काही क्षणांत घडलेल्या या तीव्र हालचालीमुळे हा अपघात झाला.

**असे का घडले असावे?**

ही घटना समजून घेण्यासाठी नदीच्या पात्रात दिसणारे भोवरे डोळ्यासमोर आणा. जत्रेत मोठ्या चक्रीत बसण्याचा अनुभव घेतला असेल, तर खाली येतानाच्या वजनहीनतेची कल्पना असेलच. त्याचप्रमाणे, विमान अचानक खाली येते, तेव्हा प्रवाशांसह सर्व मोकळ्या वस्तू वर फेकल्या जातात. सिंगापूर एरलाइन्सच्या विमनात असेच घडले. मोठ्या चक्रीत बसण्याचा अनुभव नसेल, तर गतिरोधकावरून किंवा रस्त्यावरील खड्ड्यांवरून वेगाने निघालेल्या एसटीच्या प्रवासाची आठवण करा. तो अनुभव शंभर पटीने वाढवल्यावर काय परिस्थिती होईल, याची कल्पना करा.

**हे टाळले असते का?**

माझ्या मते ते शक्य नव्हते; कारण निरभ्र हवेतली खळबळ (कॅट) हे एक छुपे संकट आहे. प्रवासी आणि विमानाला कसलाही त्रास व धोका होऊ नये, म्हणून आम्ही नेहमीच काळजी घेतो; त्यामुळे कोणीही वैमानिक दिसत असलेल्या किंवा अनुमानित खळबळी वाऱ्याच्या ठिकाणी जाणूनबुजून जाणार नाही, हे मी खात्रीने सांगू शकतो. सांख्यिकीयदृष्ट्या हवाई प्रवास हे वाहतुकीचे सर्वांत सुरक्षित साधन आहे; परंतु वेग जास्त असल्याने क्वचितच जे अपघात घडतात, त्यात दुखापती मोठ्या होतात, म्हणूनच प्रसिद्धी मोठ्या प्रमाणावर होते.

**काय काळजी घ्यावी?**

विमान प्रवासात तीन गोष्टी काटेकोरपणे पाळाव्यात.

१. बसलेले असताना नेहमीच आसन पट्टा बांधलेला असावा. निष्कारण उभे राहणे किंवा चालणे टाळावे.

२. विमानात असताना परिचारकांनी (केबिन क्रू) दिलेल्या सर्व सूचनांचे पालन करावे. ते फक्त आपल्याला खाद्यपदार्थ देण्यासाठीच नसतात, तर त्यांचे मुख्य काम आपली सुरक्षितता सुनिश्चित करणे हे आहे. आपण सहकार्य केल्याशिवाय ते त्यांचे काम करू शकत नाहीत. त्याचप्रमाणे वैमानिकांनी केलेल्या सूचनाही आवर्जून ऐकल्या पाहिजेत.

३. सहकार्य करण्यासाठी, आपण आधी त्यांच्या सूचनांकडे लक्ष दिले पाहिजे.

मी साधारणतः कॉकपिटमध्ये असतो; पण प्रवासी केबिनमध्ये बसण्याची संधी मिळते, तेव्हा मी सुरक्षा सूचना चालू असताना प्रवाशांचे निरीक्षण करतो. जवळजवळ सगळे प्रवासी त्या सूचनांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करीत असतात. भारतीय प्रवासी परदेशी लोकांच्या मानाने जास्त अधीर आणि मागणी करणारे असतात, असे माझे परिचारक मित्र सांगतात. एका मित्राच्या मते, विमानाचे तिकीट घेतल्यावर अगदी विमान कंपनी विकत घेतल्यासारखे बरेच जण वागतात.एकदा मी प्रवासी म्हणून माझ्या वैमानिकाच्या गणवेशात जात असताना, माझ्या शेजारी बसलेला माणूस आमचे विमान टेक ऑफ करण्यासाठी धावपट्टीकडे जात असताना, सारखा फोनवर बोलत होता. मी रोखून पाहिल्यावर त्याने माझी नजर चुकवत, एकामागे एक कॉल करणे चालू ठेवले. आसपासचे सगळे प्रवासी त्याच्याकडे आश्चर्याने बघत होते. एक परिचारिका त्याला दटावून गेली; पण हा पठ्ठ्या कोणाचे ऐकायला तयार नव्हता.शेवटी टेक ऑफच्या वेळी मी त्याला म्हणालो, 'भाईसाहब, अब बंद भी करो, वरना...' माझा गणवेश आणि भाईसाहब हा शब्द मी 'भ'ने सुरू होणाऱ्या अनेक अपशब्दांच्या ठसक्यात वापरल्यामुळे तो महाभाग वरमला आणि फोन बंद करून लगेच झोपी गेला. प्रवासभर तो उघडे तोंड ठेवून मोठ्याने घोरत होता. नशीब त्याचे, की त्याच दिवशी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे विमानाचे लँडिंग जरा खराब झाले आणि कोणी तरी किंचाळले. ते ऐकून माझा शेजारी खडबडून जागा झाला आणि माझा हात घट्ट पकडून 'बचाओ, बचाओ...' असे ओरडू लागला. त्याला बघून इतर प्रवाशांत हशा पिकला!थोडक्यात सांगायचे म्हणजे, बसून राहा, वैमानिक व परिचारकांच्या सूचनांचे पालन करा. क्वचित प्रसंगी काही घडले, तर तेच आपल्याला सुरक्षित ठेवणार आहेत.

# १० वर्षे, १६ अर्ज–तहसील कार्यालयाचं दरवाजा की दगडाचा किल्ला?

## मुख्यमंत्री साहेब योजनेत रस्ता दिला प्रत्यक्षात चिखल दिला!

### सरकारचं 'शेतकरी प्रेम' खोटं?

**राज्यातील सत्ताधारी नेहमी शेतकऱ्यांचे रक्षणकर्ते असल्याचा आव आणतात. पण प्रत्यक्षात मात्र तहसील कार्यालयाच्या दारात पावसात भिजणाऱ्या शेतकऱ्यांकडे पाहायला कोणताही अधिकारी येत नाही. १० वर्षे उलटूनही न्याय मिळत नाही, यावरून शासन किती गंभीर आहे, हे समजतं!शेवटी एकच सवाल –मुख्यमंत्री साहेब, किती वेळा अर्ज करायचे? किती वेळा मेल टाकायचे? आता काय – मृत्यूच सरकारला जागं करणार का?खडकी आणि देवळा येथील शेतकऱ्यांच्या डोळ्यातील पाणी हा पावसाचा भाग नसून, शासनाच्या निष्क्रियतेवरचा रडवेला हळवा सवाल आहे...**

**बीड । लोकपत्रकार भांगे**

मौजे खडकी आणि देवळा, ता. वडवणी, जि. बीड या दोन गावांतील शेतकरी गेल्या १० वर्षांपासून एकाच मागणीसाठी तहसील कार्यालयाची उंबरे झिजवत आहेत – शिव रस्ता मोकळा करा! २०१५ पासून शासकीय रस्त्यावर अतिक्रमण झाले असून, या रस्त्याचा उपयोग शेतात जाण्यासाठी दोन्ही गावांतील अनेक शेतकरी करतात. पण हे अतिक्रमण दूर करण्यासाठी दिलेले अनेक लेखी अर्ज, ई-मेल, विनंत्या, आणि आठवणी – सर्व हवेत विरल्या आहेत!

मुख्यमंत्री साहेब, 'समग्र योजना' फक्त भाषणातच का?एकीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंचावरून मोठ्या थाटात घोषणा करतात – प्रत्येक शेतकऱ्याच्या शेताला रस्ता मिळणार. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करणार.मात्र, खडकी व देवळा येथील शेतकऱ्यांना ही योजना कधी लागू होणार?



### तहसीलदार वडवणी झोपलेत का?

**१६ वेळा लेखी अर्ज, जिल्हाधिकाऱ्यांना विनंत्या, मंत्री अब्दुल सत्तार, महसूलमंत्री बावनकुळे यांच्यापर्यंत मेल – आणि तरीही परिस्थिती बदललेली नाही. शेवटी या अन्यायकारक दुर्लक्षामुळे खडकी व देवळा येथील शेतकरी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसलेत.सर्वात धक्कादायक गोष्ट म्हणजे, उपोषणाच्या दिवशी मुसळधार पाऊस सुरू होता, तरीही शेतकरी जागा बदलत नाहीत. त्यांनी स्पष्ट शब्दात सांगितलं – आमच्या जीवाला काही झालं, तर जबाबदारी तहसीलदार वडवणी यांची असेल!**

# राज्याच्या मंत्रिमंडळात फेरबदल होणार:उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**पंढरपूर (वृत्तसंस्था)**–महाराष्ट्रात सध्या आमदारांचे अनेक व्हिडिओ समोर येत आहेत. कोणी मारामारी करत आहे, तर कोणाच्या घरात पैशांनी भरलेली बॅग दिसून येत आहे. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे हे विधिमंडळात मोबाइलवर रम्मी खेळतानाचा व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला. यावरून विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर टीकेची झोड उठवली आहे. या पार्श्वभूमीवर मंत्रिमंडळात फेरबदल होणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सूचक विधान केले आहे.

पंढरपूर येथे एकनाथ शिंदे यांना संत नामदेव महाराज यांच्या नावे पुरस्कार जाहीर झाला. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी सध्याच्या राजकारणावर भाष्य केले आहे. ते म्हणाले, आम्ही टीम म्हणून काम करत आहोत. पद खाली वर होत असतात, असे म्हणत त्यांनी मंत्रिमंडळात फेरबदल होणार असल्याच्या चर्चांवर सूचक विधान केले आहे. तसेच पुढे बोलताना ते म्हणाले, चांगले काम करण्याचा सरकारचा अजेंडा आहे. आमचा अजेंडा खुर्ची नाही, खुर्चीत ज्यांनी बसवले त्यांचे प्रश्न सोडवणे हा आमचा अजेंडा आहे. देवेंद्र फडणवीस



यांच्या नेतृत्वात आम्ही सारे एकत्र आहोत, असे शिंदे यांनी म्हटले.यावेळी पत्रकारांनी लाडकी बहीण योजनेमुळे सरकार अडचणीत येत आहे का? असा सवाल केला. यावर उत्तर देताना एकनाथ शिंदे म्हणाले, असे काहीही नाही. एसटी महामंडळाने एकत्र बूकिंगवर ३० टक्के वाढ केली होती. त्याबद्दल मी सकाळीच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याशी बोललो आहे. त्यांनी जी काही वाढ केली आहे ती रद्द करण्यास सांगितले आहे.

# कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना उपमुख्यमंत्री पवारांकडून कानपिचक्या

## इजा झाल, बिजा झालं आता तिसऱ्यांदा अशी वेळ येऊ देऊ नका

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यात कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचं नाव त्यांच्या वादग्रस्त विधानामुळे सध्या मोठ्या चर्चेत आहेत . काही दिवसांपूर्वी त्यांनी शेतकऱ्यांसंदर्भात केलेल्या वक्तव्यावरून आधीच संतप्त वातावरण निर्माण झालं होतं. त्यातच विधिमंडळाच्या सभागृहात रम्मी खेळत असल्याचा व्हिडिओ समोर आल्यानं वाद आणखी गडद झाला आहे. विरोधी पक्षनेते आणि शेतकरी संघटनांनी त्यांच्या राजीनाम्याची जोरदार मागणी केली आहे. विरोधकांकडून विशेषतः शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून माणिकराव कोकाटेंना सतत टार्गेट केले जात आहे.



या प्रकरणावर उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी भाष्य करत आपली भूमिका मांडली. सभागृहातील प्रकार असल्यामुळे तो विधानसभाध्यक्ष आणि विधानपरिषद सभापती यांच्या कार्यक्षेत्रात येतो. माझी कोकाटेंशी अद्याप प्रत्यक्ष चर्चा झालेली नाही. मी त्यांच्याशी थेट संवाद साधणार आहे, असं अजित पवार म्हणाले. ते पुढे म्हणाले, सरकारविषयी असभ्य शब्द वापरणं, सभागृहात गैरवर्तन करणं या गोष्टी गांभीर्याने घेतल्या जातील. मंत्री पदावर असताना शिस्तीत वागणं आवश्यक आहे. यापूर्वीही कोकाटेंनी अशी चूक केली होती, त्यावेळी मी त्यांना समज दिली होती. इजा झालं, बिजा झालं आता तिसऱ्यांदा अशी वेळ आणू नका असं मी माणिकराव कोकाटेंना सांगितलं आहे., सांगली जिल्ह्यातील एका तरुण कंत्राटदाराने आत्महत्या केल्याच्या घटनेबाबतही अजित पवारांनी प्रतिक्रिया दिली. या प्रकरणात मुख्य कंत्राटदाराने सब-कंत्राटदाराला पैसे न दिल्याचं समोर आलं आहे. या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल. कुणाला बिले मिळाली नाहीत, तर ती माहिती सरकारला द्यावी. प्रक्रिया पूर्ण करूनच बिले दिली जातात, असंही त्यांनी नमूद केलं. या साऱ्या पार्श्वभूमीवर, कोकाटेंचा राजीनामा घेतला जाईल का, या प्रश्नावर अजित पवार म्हणाले की, मुख्यमंत्री व मी एकत्र बसून यावर निर्णय घेऊ. योग्य ती कारवाई केली जाईल.

# वृक्षारोपण व पुस्तक वितरण मोहिमेने करणार आदिवासी दिन साजरा–मा क प



**अकोले । प्रतिनिधी**

क्रांतिकारकांच्या विचारांचा वारसा नव्या पिढीत रुजवण्यासाठी मोठ्या प्रमाणात तालुकाभर पुस्तक विक्री व वितरण आणि पर्यावरण रक्षणासाठी व आदिवासी कुटुंबाचे उत्पन्न वाढावे यासाठी हिरडा, सिताफळ, जांभुळ, कौठ या झाडांची रोपे वितरणाची व्यापक मोहीम करून आदिवासी दिन साजरा करण्याचा निर्णय मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या तालुका कमिटीच्या बैठकीत घेण्यात आला. दिनांक २८ जुलै हा जगभर जागतिक निसर्ग संवर्धन दिन म्हणून साजरा केला जातो. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या राज्य कमिटीने घेतलेल्या निर्णयानुसार २८ जुलै रोजी सबंध राज्यभर गावोगावी वृक्षारोपण करून हा दिवस साजरा केला जाणार आहे. अकोले तालुक्यामध्ये २८ जुलैपासून तालुकाभर वृक्षारोपणाचे व रोपे वितरणाचे व्यापक अभियान सुरू करण्यात येत असून ते ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिन व क्रांती दिना पर्यंत चालेल. पक्षाच्या कार्यालयात याबाबत जोरदार तयारी सुरू असून अकोले विभागात वाटप करण्यासाठी आवश्यक असलेली रोपे कॉम्रेड सदाशिव साबळे यांच्या नेतृत्वाखाली उपलब्ध करण्यात आली आहेत. कॉम्रेड एकनाथ मेंगाळ यांच्या नेतृत्वाखाली समशेरपुर पट्ट्यात हे अभियान राबवले जात असून रोपे उपलब्ध करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. कॉम्रेड नामदेव भांगरे यांच्या नेतृत्वाखाली राजूर व शेंडी पट्ट्यामध्ये रोपे वितरणाचा व वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. अकोले, संगमनेर, राहुरी, पारनेर व नगर तालुक्यात अशाच प्रकारे वृक्षारोपणाचे व रोपे वितरणाचे अभियान करण्यात येणार आहे. ९ ऑगस्ट आदिवासी दिनाच्या दिवशी मध्यवर्ती चौकामध्ये क्रांतिकारकांचा इतिहास व विचार सांगणाऱ्या पुस्तकांचा स्टॉल लावण्यात येणार असून या माध्यमातून विचारांचा जागर तरुण पिढीमध्ये घेऊन जाण्याचे प्रयत्न मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने करण्यात येणार आहे.

# श्रीक्षेत्र गोळवाडी येथे श्री लक्ष्मी माता यात्रा उत्साहात संपन्न

## पंचक्रोशीतील भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती

**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूर तालुक्यातील श्रीक्षेत्र गोळवाडी येथे २४ जुलै (गुरुवार) रोजी श्री लक्ष्मी मातेची यात्रा पारंपरिक उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भक्तजनांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धार्मिक वातावरण निर्माण केले.

यात्रेच्या दिवशी पंचक्रोशीतील अनेक गावांमधून आलेले महिला, पुरुष व लहान मुलांनी उत्सवाचा आनंद घेतला. संपूर्ण गावात धार्मिक उत्साह, सजावट आणि भक्तीमय वातावरण पाहायला मिळाले.यात्रेचे नियोजन गावातील मच्छिंद्र सोनवणे यांनी समर्थपणे केले. त्यांच्या उत्कृष्ट आयोजनामुळे यात्रा सुरळीत पार पडली. त्यामुळे ग्रामस्थांनी त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.यात्रा हे गावाचे वार्षिक सांस्कृतिक व धार्मिक वैभव असून, यामुळे गावामध्ये एकात्मता आणि भक्तिभाव अधिक दृढ होतो, असे भाविकांचे म्हणणे आहे.



# महसूलच्या अधिकाऱ्यांना फेसपद्धारे हजेरी बंधनकारक ज्या गावात नोकरी, तिथूनच उपस्थिती लावावी लागणार

## अधिकाऱ्यांची नियमित उपस्थिती अत्यंत आवश्यक; चंद्रशेखर बावनकुळे यांचा मोठा निर्णय

**मुंबई (वृत्तसंस्था)**–महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठा निर्णय घेतला आहे. महसूलच्या अधिकाऱ्यांची आता रोज फेसपद्धारे हजेरी लावावी लागणार आहे. यामध्ये तलाठी पासून उपजिल्हाधिकारी यांच्यापर्यंत सर्वांना फेसपद्धारे हजेरीचे बंधन करण्यात आले आहे. फेसपवर हजेरी दाखवली नाही तर संबंधीत अधिकारी हा गैरहजर समजला जाणार आहे. विशेष म्हणजे ज्या गावात नोकरी आहे, तिथूनच उपस्थिती लावावी लागणार आहे.राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल खात्यातील प्रशासकीय कार्यक्षमतेत पारदर्शकता आणण्यासाठी एक मोठा निर्णय घेतला आहे. आता तलाठी पासून ते उपजिल्हाधिकारी यांच्यापर्यंत सर्व महसूल अधिकाऱ्यांना दररोज फेसपद्धारे हजेरी लावणे बंधनकारक करण्यात आले आहे.या नव्या आदेशानुसार, फेसपवर हजेरी नोंदवलेली नसेल तर संबंधित अधिकारी 'गैरहजर' समजले जाणार आहेत. हजेरीची ही नवी पद्धत ऑगस्ट २०२५ पासून संपूर्ण राज्यभर लागू होण्याची शक्यता आहे.यासोबतच एक महत्त्वाची अट अशी आहे की, संबंधित अधिकाऱ्याने आपली उपस्थिती फक्त ज्या गावात त्यांची नेमणूक आहे, त्या गावातूनच लावावी लागणार आहे. यामुळे फील्डवर न जाता कार्यालयीन उपस्थिती दाखवण्याच्या प्रथेला आळा बसेल, अशी सरकारला अपेक्षा आहे.

**या निर्णय घेण्यामागील उद्दिष्टे**

महसूल कर्मचाऱ्यांची उपस्थिती सुनिश्चित करणे

जनतेला वेळेवर सेवा मिळवून देणे

प्रशासनात पारदर्शकता आणि जबाबदारी निर्माण करणे

हा निर्णय राबवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना संबंधित सूचना देण्यात आल्या आहेत. महसूल विभागाशी संबंधित ७/१२ उतारे, उत्पन्न प्रमाणपत्रे, जमीन मोजणी, फेरफार नोंदणी यांसारख्या सेवांसाठी नागरिकांना कार्यालयात वारंवार जावे लागते. त्यामुळे अधिकाऱ्यांची नियमित उपस्थिती अत्यंत आवश्यक असल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. हा निर्णय महसूल प्रशासनातील शिस्त आणि सेवा वितरणामध्ये नवे पर्व घडवेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**जनसंवादाच्या माध्यमातून नागरिकांच्या अडचणी सोडवाव्यात**

महसूल विभागाचे काम गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख होण्यासाठी विभागातील अधिकाऱ्यांनी नागरिकांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या अडचणी जाणून घ्याव्यात. जनसंवाद, लोकशाही दिन आदी माध्यमातून त्यांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करावा, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. रायगड जिल्ह्यातील महसूल विभागाशी संबंधित कामांचा आढावा मंत्री बावनकुळे यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेतला.

**लोकअदालत सारख्या माध्यमांतून अर्ध न्यायिक प्रकरणांच्या सुनावण्या**

राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये रायगड जिल्हा प्रशासन मागे राहणार नाही याची दक्षता घ्यावी. शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमित करुन लाभार्थ्यांना घरांसाठी पट्टे उपलब्ध करुन द्यावेत. नवीन वाळू धोरण आणि मार्गदर्शक सूचनांनुसार वाळू उपलब्ध करुन द्यावी. भूमि अभिलेख विभागाच्या आधुनिकीकरणासाठी जिल्हा नियोजनच्या निधीमधून खर्च करण्यात यावा. पाणंद रस्त्यांना क्रमांक देऊन दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात यावी. लोकअदालत सारख्या माध्यमांतून अर्धन्यायिक प्रकरणांच्या सुनावण्या येत्या तीन महिन्यात पूर्ण कराव्यात. याचबरोबर जिवंत सातबारा, तुकडेबंदी, शेतरस्ता, भोगवटादार २ मधून १ मध्ये करण्याची तसेच आकारी पड जमिनीची प्रकरणे, स्वामित्व योजनेचा लाभ देणे आदी कामे देखील कालमर्यादेत मार्गी लावावीत, असे निर्देश त्यांनी दिले. रायगड जिल्हाधिकारी तसेच जिल्ह्यातील महसूल अधिकाऱ्यांनी यावेळी सुरू असलेल्या विविध कामांचा अहवाल सादर केला.



# मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाशी जिल्ह्यातील ५२ रूग्णालये संलग्न

## जिल्ह्यात ६१० रुग्णांना ४ कोटी ८९ लाख ६ हजार रुपयांचे अर्थसहाय्य वितरीत

**बीड | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष पात्र व गरजू रुग्णांसाठी वरदान ठरत आहे. १ जानेवारी ते ३० जून दरम्यान बीड जिल्ह्यात ६१० रुग्णांना ४ कोटी ८९ लाख ६ हजार रुपयांची मदत करण्यात आली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे नोडल अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी डॉ. चैतन्य कागदे यांनी दिली.

राज्यातील नागरिकांना दुर्धर आजारांवरील उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडून आर्थिक सहाय्य देण्यात येते. तसेच आपत्ती प्रसंगीही आर्थिक मदत देण्यात येते. यासाठी राज्यातील कानाकोपऱ्यातून मदत मिळविण्यासाठी नागरिक मंत्रालयात जात असत. परंतु नागरिकांना या सेवा सहजपणे त्यांच्या जिल्ह्याच्या ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात, म्हणून आता प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. सध्या बीड येथे हा कक्ष जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीत कार्यरत आहे.

वैद्यकीय मदत मिळण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाशी संलग्नित जिल्ह्यातील ५२ रुग्णालयांचा समावेश आहे. या निधीच्या मदतीतून रुग्ण या रुग्णालयात उपचार करुन घेतात. संलग्नित रुग्णालयांची यादी पुढीलप्रमाणे.




बीड शहर विठ्ठल हॉस्पिटल, लाईफ लाईन मल्टी स्पेशालिटी सर्जिकल हॉस्पिटल, कृष्णा हॉस्पिटल, सावळकर हॉस्पिटल, स्वामी विवेकानंद मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, संकल्प हॉस्पिटल, गुरुकृपा क्सिडेंट हॉस्पिटल आणि डायग्नोस्टिक सेंटर, रेणू हॉस्पिटल, बार्शी रोड, हाके हॉस्पिटल, फोनिक्स क्रिटिकल केअर अँड सर्जिकल युनिट, दीप हॉस्पिटल अँड क्रिटिकल केअर युनिट, श्री माऊली हॉस्पिटल (क्रिटिकल सर्जिकल), साईबाबा हॉस्पिटल, ओम सर्जिकल हॉस्पिटल, जालना रोड, तुळशी क्लिनिक, यश हॉस्पिटल, बार्शी रोड, आनंद हॉस्पिटल, जालना रोड, वीर्यान हॉस्पिटल, देशमुख हॉस्पिटल, जालना रोड, श्री बाल रुग्णालय, जुने बीड, यशवंतराव जाधव स्मारक रुग्णालय आणि संशोधन केंद्र प्रा. लि., सुश्रुत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, स्पंदन हॉस्पिटल, नोबल मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, लन हॉस्पिटल, गौरी हॉस्पिटल, लाड बाल रुग्णालय, जीएसके हेल्थकेअर एलएलपी, जुने बीड, काकू नाना मेमोरिअल हॉस्पिटल, यशवंत मातृ रुग्णालय, योगीराज हॉस्पिटल आणि आयसीयू, लाईफ लाईन हॉस्पिटल, नगर नाका, जीएसके हेल्थ केअर एलएलपी, महिला कॉलेज रोड, नवीन बीड, नीरा बाल रुग्णालय, डी.पी. रोड, फोनिक्स क्रिटिकल केअर आणि सर्जिकल युनिट, जालना रोड, घोलवे हॉस्पिटल, भाग्य नगर, सूर्या मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल आणि क्रिटिकल केअर युनिट, डी.पी. रोड, आयकॉन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, महानंदा हॉस्पिटल, श्री बाल रुग्णालय, जनाई बाल रुग्णालय, श्री नारायणी चाइल्ड केअर युनिट, वेलनेस मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, संजिवनी हॉस्पिटल आणि क्रिटिकल केअर

परळी वैजनाथ

श्रीकृष्ण क्सिडेंट हॉस्पिटल, कराड हॉस्पिटल, श्री समर्थ हॉस्पिटल

अंबाजोगाई

आशा इंटेन्सिव्ह केअर युनिट आणि रिसर्च सेंटर

माजलगाव

शतायुषी फाउंडेशन, यशवंत हॉस्पिटल अँड क्रिटिकेअर

आष्टी

शेंडगे हॉस्पिटल, कडा

गेवराई

आधार मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अँड क्रिटिकल केअर सेंटर

---

# राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या गणप्रमुख व कार्याध्यक्षांच्या निवडी जाहीर

## पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या हस्ते पदाधिकाऱ्यांना नियुक्तीचे पत्र बहाल

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची नव्याने संघटनात्मक बांधणी करण्यात येत आहे. परळी तालुक्यातील सर्व पंचायत समिती गणाचे प्रमुख तसेच कार्याध्यक्ष यांच्या नव्या निवडी नुकत्याच जाहीर करण्यात आल्या आहेत. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले व भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या परळी तालुक्यातील गणप्रमुख व कार्याध्यक्ष यांच्या नव्याने नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. ज्यामध्ये अशोक कदम, तुकाराम कावळे, अनंत तिडके, ड.अर्जुन सोळंके, प्रल्हाद गित्ते, घोडके बालाजी, रामचंद्र फड, शिवाजी चाटे, नितीन घोडके, अशोक कदम, महादेव राठोड, पंडित गुट्टे, अमोल देवकते, बालासाहेब साबळे यांच्या नव्याने निवड करण्यात आलेल्या कार्यकारिणीत पदाधिकारी म्हणून निवडी करण्यात आल्या आहेत. तर डॉ.माणिक कांबळे यांची पक्षाच्या सामाजिक न्याय विभागाचे तालुकाध्यक्ष म्हणून निवड जाहीर करण्यात आली आहे. पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी सर्वांना नियुक्तीपत्र देऊन सर्वांचे अभिनंदन केले व त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## श्रावण मासानिमित्त आज पासून बीडमध्ये

# संत चरित्र कथा व भक्त विजय कथा महोत्सव दि.२६ जुलै ते ३० जुलै खटोड प्रतिष्ठानचा भक्तिरसयुक्त उपक्रम

**बीड | प्रतिनिधी**

श्रावणमास म्हणजे भक्ति भावाने ओथंबलेला कालावधी संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या साडेसातशे व्या जयंतीचे निमित्त या शुभ प्रसंगा निमित्ताने स्वर्गीय झुंबरलालजी खटोड सामाजिक प्रतिष्ठान,बीड यांच्या वतीने संत ज्ञानेश्वर महाराज चरित्र कथा व भक्त विजय कथा संगीतमय या भक्तिपर्वा चे आयोजन करण्यात आले आहे.पाचदिवसीय कार्यक्रम दि.२६ जुलै ते दि.३० जुलै २०२५ या कालावधीत खटोड प्लाझा,वृंदावन गार्डन च्या पुढे,एमआयडीसी रोड,बीड येथे पार पडणार आहे.रोज सकाळी ११ ते सायंकाळी ९ या वेळेत कथा होणार असून,या सोहळ्यात महाराष्ट्रा तील प्रसिद्ध कीर्तनकार कथाकार ह.भ.प. प्रकाश महाराज साठे केज तसेच कीर्तनकार कथाकार ह.भ.प.प्रसाद महाराज काष्टे परभणी भक्त विजय संगीतमय कथेचे निरूपण करणार आहे.गेल्या वीस वर्षां पासून संत विचारांचा प्रचार व प्रसार करण्या साठी खटोड प्रतिष्ठान सातत्याने कार्यरतआहे. संतांची चरित्रे आणि भक्तांचे प्रेरणादायी जीवन समाजात अध्यात्मिक मूल्यांची जाणीव करून देतात. या उपक्रमाच्या माध्यमा तून समाजातील भाविकांनी अध्यात्मिक आनंदाचा लाभ घ्यावा, याकरिता हे आयोजन अत्यंत महत्त्वाचे आहे. पवित्र अशा हिंदू धर्म संस्कृतीच्या श्रावणमास ची सुरुवात झालेली आहे तरी अशा या पवित्र श्रावण मासा निमित्त सर्व बीड शहरातील भाविक भक्तांनी दोन्ही कथेचे श्रवण करावे अशी आपणास विनंती आहे

सर्व भाविक भक्तांनी या भक्तिरसपूर्ण कार्यक्रमात सहभागी व्हावे आणिअध्यात्मिक लाभ घ्यावा असे आवाहन स्वर्गीय झुंबरलालजी खटोड सामाजिक प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.




---

# प्रा.रमेश सरवदे सर यांना महाराष्ट्र रत्न २०२५ हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान



**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

आनंदी युनिव्हर्स फाउंडेशन यांच्या कडून प्रा.रमेश ज्ञानेश्वर सरवदे अंबाजोगाई यांना संगीत विषयातील अखंडपणे दिलेल्या योगदानाबद्दल महाराष्ट्र रत्न पुरस्काराने गौरवण्यात आले.आता पर्यंत त्यांनाराज्यस्तरीय देशपातळीवरील सात पुरस्कार मिळाले आहेत ही बाब अंबाजोगाई तील संगीत क्षेत्रात उल्लेखनीय आणि कौतुकास्पद आहे. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणूनच सुरताल संगीत विद्यालयाचे सर्वेसर्वा सत्यवान शिंदे,पत्रकार संघाचे सचिव राहुल देशपांडे,अभय जोशी, डॉ.संदीप जैन यांच्या कडून त्यांना गौरवण्यात आले.महाराष्ट्र रत्न पुरस्काराचे स्वरूप, पदक,सन्मान चिन्ह, सन्मानपत्र आणि एक लाख रुपये रोख स्वरूपात त्यांना आनंदी युनिव्हर्स फाउंडेशन कडून प्राप्त झाले आहेत.समस्त अंबाजोगाईकर यांच्या कडून त्याचे कौतुक होत असुन त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

---

# शेतक-यांची कर्ज माफी व इतर मागण्यासाठी प्रहार संघटनेच्या वतीने नरसीत चक्काजाम आंदोलन

**नायगाव | हनुमंत चंदनकर**

शेतक-यांचे कर्ज माफ व हमीभाव दिव्यांगाना ६००० हजार मानधन आदी मागण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते माजी मंत्री बच्चु कडू यांनी रस्त्यावरची लढाई सुरू केले असुन गुरूवारी दि.२४ जुलै रोजी राज्यभर चक्काजाम आंदोलनाची हाक देण्यात आली होती .त्या आदेशाचे पालन करत गजानन चव्हाण, रंजीत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली गुरूवारी नरसी चौकात चक्काजाम आंदोलन करत सरकार विरोधी घोषणा देण्यात आल्या . शेतकरी कर्ज माफी व्हावी यासाठी बच्चु कडू यांनी मागील दोन तीन महीण्यापासुन आक्रमक झाल्याचे दिसून येत आहेत.कर्ज माफीसह ,शेतमालाला हमीभाव व दिव्यांगांना ६०००/-रु. मानधन अशा मागण्यांसाठी मा. बच्चुभाऊ कडू यांनी पुकारलेल्या २४ जुलै २०२५ च्या राज्यव्यापी चक्काजाम आंदोलनास पाठिंबा म्हणून नरसी चौकामध्ये चक्काजाम आंदोलन करण्यात आले यावेळी चारही



रस्त्यावर वाहनांच्या रांगाच रांगा लागल्या होत्या .आंदोलनाच्या सुरूवातीला सकाळी साडे दहा वाजता गजानन पा.चव्हाण, रंजीत देशमुख आदी जणांची भाषणे झाली .या वेळी सरकारवर कडकडून टिका करण्यात आले .रास्ता रोको आंदोलन संपल्यावर नायबतहसीलदार विजय येरावार , स.पो.नि.विक्रम हराळे , मडळधिकारी सौ. शितल स्वामी , तलाठी शाम मुंडे यांना निवेदन देण्यात आले .या आंदोलनात मारोती मंगरूळे (जिल्हा सचिन, नांदेड)चांदु आंबटवाड (जिल्हा प्रसिब्दी प्रमुख नांदेड)हाणमंत सिताफुले , अनिल शेट गणेश हांडे (जिल्हा संपर्क प्रमुख)राजेश राजेश विठ्ठल बेळगे (जिल्हा संपर्क प्रमुख नांदेड) साईनाथ बोईनवाड ओमप्रकाश नल्लावार , गोपिनाथ आंबटवार ( मुंडे ) जिल्हा कार्याध्यक्ष प्रहार संघटना. मिलिंद कागडे शंकर भाऊ आचेवाड , बालाजी राठोड आदी जण सामिल होते .आंदोलना दरम्यान अनुसूचित प्रकार घडू नये म्हणून रामतीर्थ पोलीस ठाण्याचे स.पो.नि.विक्रम हराळे यांनी चौक बंदोबस्त ठेवला होते.

---

# जळगाव येथील ज्येष्ठ समाजसेवक केदारनाथजी दायमा यांचे दुःखद निधन, सामाजिक,धार्मिक क्षेत्रात हळहळ

**जळगाव | प्रतिनिधी**

जळगाव शहरातील दधीची समाजाचे ज्येष्ठ आधारस्तंभ,समाजसेवा,धार्मिक कार्य आणि पत्रकारितेमध्ये आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे श्रीमान केदारनाथजी दायमा यांचे आज सकाळी ११-३० वाजता आकस्मिक निधन झाले.त्यांच्या निधनामुळे संपूर्ण दधीची समाजात तसेच जळगाव परिसरात शोककळा पसरली आहे.केदारनाथजी दायमा हे जळगाव दधीची समाजाचे माजी अध्यक्ष होते.त्यांनी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्य केले.सामाजिक सलोखा,आपुलकी बंधुभाव आणि धार्मिक कार्यांमध्ये त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला.त्यांचे नेतृत्वप्रणाली,संयमित भाषाशैली आणि सर्वांना समान वागणूक देण्याचा त्यांचा स्वभाव हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे खास पैलू होते. त्यांचा साप्ताहिक त्यागमय महर्षी दधीची या पत्रिकेचा संपादक म्हणून उल्लेखनीय कार्यकाल होता.दधीची समाजातीलसांस्कृतिक, आध्यात्मिक व वैचारिक विचारांना त्यांनी या माध्यमातून नेहमीच चालना दिली.त्यांच्या लेखनातून समाजाला दिशा देण्याचे कार्य त्यांनी आयुष्यभर केले.

तसेच ते श्री भवानी आणि महालक्ष्मी मंदिर संस्थानाचे विश्वस्त होते. या संस्थानाच्या कामकाजात पारदर्शकता,भक्तांच्या सेवा-सुविधा आणि धार्मिक परंपरेच्या जतनासाठी त्यांनी योगदान दिले.मंदिर परिसराच्या विकासा साठी त्यांनी विविध योजना राबवल्या.व्यक्तिगत जीवनात ते अत्यंत प्रेमळ,संयमी व आदर्श कुटुंबप्रमुख होते.ते श्रीकांत (शंकर) दायमा यांचे वडील, परमपूज्य ह.भ.प. समाधानजी महाराज शर्मा यांचे सासरे, ओमप्रकाशजी दायमा यांचे मोठे बंधू तसेच गोपाल आणि दीपक यांचे मोठे पप्पा होते.त्यांच्या अचानक निधनामुळे समाजातील अनेक संस्था,मंडळे आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी दुःख व्यक्त केले आहे.राज्य दधीची समाज सेवा व विकास संस्था,श्री दधीची नवयुवक मंडळ,श्री भवानी व महालक्ष्मी मंदिर संस्थान यांच्या तर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली आहे. संस्थानाच्या वतीने प्रसिद्ध केलेल्या श्रद्धांजली संदेशात म्हटले आहे की,ईश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती देवो,त्यांच्या कुटुंबीयांना या दुःखद प्रसंगी सहनशक्ती प्रदान करो,हीच प्रार्थना. दधीची समाजाने एक आदर्श व्यक्तिमत्त्व, कार्यक्षम नेता आणि आपुलकीने वागणारा मार्गदर्शक गमावला आहे.त्यांच्या कार्याची प्रेरणा पुढील पिढ्यांना सदैव मार्गदर्शक ठरेल. तसेच केज येथील श्री ठाकुर रामकृष्ण परमहंस परिवाराच्या वतीने त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077